महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,**
शासकीय तंत्र निकेतन इमारत, क विभाग,दुसरा मजला,
४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
कार्यालयाचा दुरध्वनी क्र.२६४७ ४४ ३५ website : www.msbve.gov.in Email : chairman-msbve@nic.in

जा.क्र.मराव्यशिपमं/का-१/ता.मा.(LOI)/9CCC /२०१४
दिनांक :- 26 SEP 2014

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये संस्थांना मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी **तात्पुरती मान्यता (Letter Of Indent)** प्रदान करणे.

संदर्भः- १) शिक्षण व सेवायोजन विभाग,मंत्रालय,मुंबई यांचा शासन निर्णय क्रमांक : इएक्सएम-७३८४/ ३५८७५१/(५३५)/तांशि-१(अ), दि.२३ जानेवारी १९८६.
२) मंडळ कार्यालयाचे पत्र क्र. मराव्यशिपमं/का-१/मान्यता/२०१४-१५/२७९९,दिनांक २३/१०/२०१३
३) जिल्हा कार्यालयाचे पत्र / संस्थांचे निवेदनानुसार

**कार्यालयीन आदेश :-**

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये **ठाणे** जिल्हयांतील सोबत जोडलेल्या जिल्हा निहाय यादीतील (मंडळाचे अभ्यासक्रम नव्याने सुरु करणे, जुन्या संस्थेत नविन अभ्यासक्रम, जुन्या संस्थेतील अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमात तुकडी वाढ करणे.) **प्रपत्र - अ** मध्ये दर्शविलेल्या संस्थांना अभ्यासक्रम चालविणेसाठी खालील अटींच्या अधीन राहून **तात्पुरती मान्यता (Letter Of Indent)** देण्यात येत आहे. ज्या संस्थांना तात्पुरती मान्यता (LOI) नाकारणेत आलेली आहे त्याचा तपशिल **प्रपत्र - ब** मध्ये दर्शविणेत येत आहे.

## <u>अटी व शर्ती :-</u>

१ अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांना शासन, संचालनालय, मंडळ कार्यालय / संचालनालयाच्या अधिपत्याखालील संबंधित कार्यालयांचे कडून वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील.

२ ज्या संस्थांना मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी तात्पुरती मान्यता (Letter Of Indent) देणेत आलेली आहे, अशा संस्थांनी अभ्यासक्रमांसाठी आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधांची जसे हत्यारे, यंत्रसामुग्री, साधनसामुग्री आणि फर्निचर्स, विहित शैक्षणिक अर्हतेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी नेमणूक करणे, जागा इत्यादींची पुर्ण पुर्तता मान्यता कार्यक्रमानुसार विहित मुदतीत करणे आवश्यक आहे.

३ ज्या संस्था पायाभूत सुविधांची पुर्ण पुर्तता करतील, अशा संस्थांनी विहित मुदतीत संबंधीत जिल्हयांचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी हयांचेकडे कार्यालयीन आदेश निर्गमित झालेचे दिनांकापासून १ महिन्यांचे आंत दिलेल्या नमुन्यात अर्ज (नमुना माहितीपुस्तिकेत) सादर करावयाचा आहे.

४ सदरची तात्पुरती मान्यता (LOI) एक वर्षापर्यंत वैध (Valid) असून ज्या संस्था कार्यालयीन आदेश निर्गमित झालेचे दिनांकापासून १ महिन्यांचे आंत पायाभूत सुविधा पूर्तता झालेबाबतचे अर्ज संबंधीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी हयांचेकडे सादर करतील त्या संस्थांना मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी सन २०१४-१५ सत्रासाठी मान्यता प्रदान करणेत येईल.

५ ज्या संस्था अ.क्र.४ मध्ये दिलेल्या मुदतीनंतर दि.३१ डिसेंबर, २०१४ पर्यंत पायाभूत सुविधा पुर्तता झालेबाबतचे अर्ज संबंधीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाकडे सादर करतील, त्या संस्थांना सन २०१५-१६ सत्रासाठी मान्यता प्रदान करणेबाबत विचार करण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी.

६ जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी हयांचेकडे ज्या संस्थांचे पायाभूत सुविधा पुर्ण पुर्तता झालेबाबतचे अंर्ज प्राप्त होतील अशा संस्थांचे जिल्हा स्तरावरील समितीमार्फत निरीक्षण / तपासणी करणेत येईल. **(जिल्हा समिती जे छाननी तक्ता क्र.२ वापरणार आहे त्याचा नमुना व त्याबाबतचे मार्गदर्शक सूचना सोबत देणेत येत आहे.)** यासाठी संबंधीत संस्थेने छाननी तक्त्यात दिलेप्रमाणे सर्व बाबींचा तपशिल समितीसमोर तपासणीसाठी उपलब्ध करणे आवश्यक आहे.

७ मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी संस्थांना, ज्या जागेत तात्पुरती मान्यता (LOI) देणेत आलेली आहे. त्याच जागेसाठी विद्यार्थी प्रवेश करणेची मान्यता प्रदान करणेत येईल. जर जागा बदल आढळलेस संबंधीत संस्थेची मान्यता रद्द करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

८ विहित आवश्यक असलेल्या पायाभुत सुविधांची पूर्ण पुर्तता करीत असलेल्या संस्थांनाच मंडळामार्फत विद्यार्थी प्रवेश करणेसाठीची मान्यता प्रदान करणेत येईल.

९ मंडळाकडून विद्यार्थी प्रवेश करणेची मान्यता मिळालेशिवाय संबंधीत संस्थांना अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी प्रवेश करता येणार नाही. जर संस्थेने अशा मान्यतेपूर्वी विद्यार्थी प्रवेश केलेस, असे प्रवेश ग्राहय धरणेत येणार नाही. आणि याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

१० प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व कर्मचारी वर्गांची सेवा / वेतन व तद्‌अनुषंगीक बाबींची जबाबदारी सर्वस्वी संस्थेची राहील. याबाबत शासन व शासन अधिपत्या खालील कोणत्याही कार्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

११. संबंधित अर्ज केलेल्या संस्थांचे प्राप्त नस्तिमधील अभिलेख्यानुसांर तात्पुरती मान्यता (LO I) प्रदान करण्यांत आलेली आहे. त्यामध्ये भविष्यात कांही विसंगती आढळल्यास संबधित संस्थेतेतील अभ्यासक्रमाची तात्काळ मान्यता रद्द करण्यांत येईल यांची नोद घ्यावी.

१२. शासन शुध्दीपत्रक क्रमांक : व्हीओसी-२०१२/५९१/प्र.क्र.२४५(क)/व्यशि-४, दि.१६ जानेवारी, २०१३ अन्वये आवश्यक ती अनामत रक्कम रोखीने चलनाव्दारे अथवा बँक गॅरन्टी च्या स्वरुपात संबंधीत संस्थेने भरणे आवश्यक आहे.

१३. ज्या संस्थांना मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी मान्यता देणेत येईल त्याचा तपशिल मंडळाची वेबसाईट www.msbve.gov.in वर टाकणेत येईल. याप्रकरणी कोणताही पत्रव्यवहार करण्यांत येणार नाही, नोंद घ्यावी.

सचिव,
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
मुंबई ४०० ०५१.

प्रत :-

१. मा.संचालक (व्यवसाय शिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई १ यांना माहितीसाठी
२. सविनय सादर.
३. मा.सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,**मुंबई** यांना माहितीसाठी सविनय सादर.
४. संबंधीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, **ठाणे** हयांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी. त्यांना कळविण्यांत येते की, त्यांनी संबंधीत संस्थेस कळविणेत यावे.
५. संगणक विभाग - केवळ मंडळाचे वेब साईटवर टाकणेसाठी.
६. संबंधीत संस्था.

## महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

संदर्भ :- १) मंडळ कार्यालयाचे पत्र क्र. मराव्यशिपमं/का-१/मान्यता/२०१४-१५/२७९९, दिनांक २३/१०/२०१३

२) जिल्हा कार्यालयाचे पत्र / संस्थांचे निवेदनानुसार

**प्रादेशिक कार्यालय :- मुंबई**

**जिल्याचे नाव :- ठाणे**

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता तात्पूरती मान्यता( Letter of Indent) देण्यात आलेल्या/नाकारण्यात आलेल्याा संस्थांची नावे / अभ्यासक्रम तुकडी खालील प्रमाणे

**जुन्या संस्थेत नव्याने सुरू करणे**

| अ. क्र. | संस्था कोड क्र. | संस्थेचे नाव | शैक्षणिक वर्ष २०१५-१६करिता तात्पुरती मान्यता ( Letter of Indent) देण्यात आलेल्या अभ्यासक्रमाचे नाव व तुकडयांची संख्या (प्रपत्र-अ) | | | | | शैक्षणिक वर्ष २०१५-१६करिता तात्पुरती मान्यता ( Letter of Indent) नाकारण्यात आलेल्या अभ्यासक्रमाचे नाव व तुकडयांची संख्या (प्रपत्र-ब) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अभ्यासक्रम कोड क्रमांक | अभ्यासक्रमाचे नाव | तुकडी संख्या | माध्यम | ज्या नावाने आणि ज्या जागेत संस्था सुरू करावयाची त्याचा पूर्ण पत्ता | अभ्यासक्रम कोड क्रमांक | अभ्यासक्रमाचे नाव | तुकडी संख्या | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | ३०४११ | यश चॅरीटेबल ट्रस्ट संचलित उषादेवी कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, ठाणे | ४०१२०८ | सी.सी.इन हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉजी | १ | म/इं. | यश चॅरीटेबल ट्रस्ट संचलित उषादेवी कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, ठाणे | ---- | ---- | ---- | ---- |
| | | | ४०११०४ | सी.सी.इन ट्रव्हल ॲण्ड टुरिझम | १ | म/इं. | | ---- | ---- | ---- | ---- |

**सचिव**

**महाराष्ट्र रा[illegible] शिक्षण**

परीक्षा मंडळ, मु[illegible] ०५१